

कोल्हापूर : तायसी क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट करणारे घोडावत स्कूलचे विद्यार्थी. सोबत प्रशिक्षक.

# तायसी क्रीडा महोत्सवात 'घोडावत'ला १११ पदके

**कोल्हापूर : (क्रीडा प्रतिनिधी)**

केरळमधील कोत्तमंगलम् येथे द असोसिएशन ऑफ इंटरनॅशनल स्कूल ऑफ इंडिया (तायसी) यांच्यातर्फे आयोजित क्रीडा महोत्सवात संजय घोडावत स्कूलने १११ पदकांसह यश मिळविले. या संघाने ३८ सुवर्ण, २९ रौप्य आणि ४४ कांस्य पदकांची कमाई केली. स्पर्धेत महेंद्र चौधरी, अंजुम पटेल यांनी 'उत्कृष्ट खेळाडू' चा बहुमान पटकाविला. श्रेयश लिपारे, शिवम शेटे, सम्यक शहा, सूर्यादित्य पाटील, उत्कर्ष सावंत, यश सोनटक्के, समर्थ मजती, पार्थ येसरे, रितू मालानी, रोहन निगम यांनी ॲथलेटिक्स व जलतरण स्पर्धेत सुवर्ण पदके जिंकली. सांघिक प्रकारातील फुटबॉल, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल प्रकारात अजिंक्यपदासह सुवर्ण पदके मिळविली.

खेळाडूंना संस्थेचे चेअरमन संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले, प्राचार्या सस्मीता मोहंती, उपप्राचार्य एच. एम. नवीन, क्रीडाप्रमुख विठ्ठल केंचन्नावर, अमर पाटील, दिनू यादव, रोहित भावरेला, चेतन होसमट, सागरिका समल, अमरदीप, रणजित मोहिते आदींचे मार्गदर्शन लाभले.